## गोदावरी नदीचं रुप पालटणार

गोदावरी नदीच्या सुशोभिकरणाचा आणि विकासाचा स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत विचार करण्यास सुरूवात झाली ते गोदेचं वैभव आणि सौंदर्य वाढवण्यासाठी. पर्यटनाच्या दृष्टीनेही गोदावरी विकास आणि सुशोभिकरणाचा विचार करण्यात आला आहे. सर्वार्थाने नाशिककरांना अभिमान वाटावा असा हा प्रकल्प आहे. त्याला मुर्त रुप आल्यावर जगभरात असलेली नाशिकच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला जाणार आहे. सध्या याप्रकल्पाच्या कामाला सुरूवात झाली आहे. 123 कोटी रुपये खर्च आणि अंदाजे 2 वर्षांचा कालावधी संपूर्ण गोदा प्रकल्पासाठी अपेक्षित आहे. या प्रकल्पांतर्गत पुढील कामे केली जाणार आहेत.



1. गोदावरी नदीची स्वच्छता – धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आणि नाशिकची जगभरात ओळख म्हणजे रामकुंड. गोदावरी नदीकिनारी रामकुंड आहे. जगभरातून पर्यटक खास रामकुंड आणि गोदेचं रुप पाहण्यासाठी येत असतात. आणि परत जाताना एक सुखद अनुभव घेऊन जात असतात. त्यामुळे सर्वात आधी गोदावरी नदीची स्वच्छता आणि त्यातील गाळ काढणे महत्त्वाचे ठरते. फॉरेस्ट नर्सरी ते होळकर पूल या 3.20 किमीच्या गोदावरी नदी पात्रातील गाळ काढण्यात येणार आहे. गाळ काढल्यामुळे नदीचे पात्र विस्तृत होऊन पुराची धोक्याची पातळी कमी होण्यात मदत होईल. तसेच, नदीचे पात्र विस्तृत झाल्यामुळे जैवविविधतेसाठीही ते पुरक ठरणार आहे. थोडक्यात काय तर पुराचा धोका आणि तडाखा कमी होण्यास मदत होणार आहे.


तसेच गोदावरी नदीच्या पाण्यावरील तरंगत असलेल्या जल वनस्पती आणि कचरा काढणे, ट्रॅश स्कीमर या अद्ययावत हायड्रोलिक सिस्टमद्वारे सुसज्ज अशा यंत्राच्या सहाय्याने नदीवर तरंगता कचरा आणि वनस्पती काढण्यात येणार आहे. नदीच्या पाण्यावर तरंगणारी जलपर्णी काढल्याने तसेच कचरा काढल्याने. नदीचे प्रदुषण रोखण्यात मदत होईल, त्याचबरोबर नदीच्या पात्राचे पाणी स्वच्छ होईल आणि पुरकाळात जलपर्णीमुळे पाण्याला होणारा अटकाव

नाहीसा होऊन पुराचा धोका कमी होईल. तसेच तीव्र उन्हाळ्याच्या काळात नदीतील प्रदुषण कमी झाल्याने पाणी स्वच्छ राहण्यात आणि पर्यायाने जैवविविधता जपली जाण्यात मदत होईल.




असे असेल ट्रॅश स्कीमर

2. होळकर पुलाखाली स्वयंचलित यांत्रिक दरवाजे (Pneumatically Operated Automated Mechanical Gates)- स्वयंचलित यांत्रिक दरवाजांमुळे गोदावरी नदीची जौवविविधता जोपासण्यास मदत होणार आहे. पुर काळात या स्वयंचलित यांत्रिक दरवाजांमुळे नदीचे पाणी बिनरोध वाहून जाण्यात मदत होईल, तेच तीव्र उन्हाळ्याच्या काळात पाण्याची पातळी कमी झाल्यावर रामकुंड आणि परिसरातील कुंडांमध्ये पाण्याचा प्रवाह सुरू राहिल. त्यामुळे रामकुंड परिसरात दुर्गंधी येणार नाही. आणि प्रवाहीत पाण्यामुळे कुंडही आटण्याची समस्या कमी होईल. होळकर पुलाखालील स्वयंचिलत यांत्रिक दरवाजांमुळे पुराची तीव्रता कमी होण्यास मदत होणार आहे.




असे असतील होळकर पुलाखालील स्वयंचलित यांत्रिक दरवाजे.


3. गोदा पार्क (9850 चौ.मी.)– लहानग्यांपासून ते अबालवृद्धांपर्यंत सर्वांसाठी सर्व काही एका ठिकाणी असणारे ठिकाण म्हणजे गोदा पार्क असणार आहे. गोदा पार्क हा स्मार्ट सिटी प्रकल्पांमधील अतिशय महत्त्वाचा असा प्रकल्प आहे. महत्त्वाचा याअर्थाने या प्रकल्पाची चर्चा जागतिक पातळीवर होणार आहे. त्याला कारणही तसंच आहे. गोदावरी नदी, रामकुंड आणि नाशिक हे समीकरण आणि त्याची ख्याती जगभरात पसरली आहे. तसेच सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून नागरिक आणि भाविक नाशिक येथे येत असतात आणि रामकुंडाला आवर्जुन भेट देत असतात. नुसता कुंभमेळाच नाही तर, वर्षातील 365 दिवस जगाच्या कानाकोपऱ्यातील नागरिक असो पर्यटक असो येथे भेट देतात. तेव्हा त्यांच्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा देण्याचा विचार झाला त्यावेळी स्मार्ट सिटी अंतर्गातील प्रकल्पामध्ये हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार आहे. येथे मनोरंजनापासून उपहार ते ऐतिहासिक वारसा जपण्यात येणार आहे. त्याचबरोबर नाशिकचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्वही येथे हेरीटेज वॉकच्या सहाय्याने अधोरेखित करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे- हेरीटेज वॉक, वॉक वे/ ॲक्युप्रेशर पाथवे, बोर्डेक्स मीरर इफेक्ट, जेट्टी, उपहारगृह,



ॲम्पीथिएटर, बबल जेट फाऊंटेन, वॉटर कॅसकेड, वॉटर प्रोजेक्शन स्क्रीन, वृक्षारोपण, सायकल मार्ग, दगडी बाकडे (गॅबीयन), हेरीटेज वॉक, ई-टॉयलेटसुविधा याप्रकल्पांतर्गत अंतर्भुत आहेत.

असे असेल गोदा पार्कचे मुख्य प्रवेशद्वार – पंचवड वृक्षांनी समृद्ध म्हणून पंचवटी असं नामकरण या परिसराचं झालं. त्यामुळे गोदा पार्कच्या सुशोभिकरणाचा विचार झाला त्यावेळी प्रवेशद्वारावरील भिंतींवर नाशिकच्या इतिहासाची माहिती, आणि नाशिकचे महत्त्व अधोरेखित करण्याचे ठरले. पूर रेषेचा विचार करता येथील संरक्षक भिंत सर्वात मोठा फॅक्टर ठरणार आहे. पुराची तीव्रता कमी करणे त्याचबरोबर गॅबियन प्रकारातील ही भिंत असल्याने पुराचे पाणी जरी आले तरी त्यातून वाहून जाणार आहे. त्यामुळे पुरानंतर पाणी साचल्याने जी दुर्गंधी येते तसेच पाण्याचा निचरा करण्यासाठी यंत्रणेला कसरत करावी लागते ते मोठ्या प्रमाणात कमी होऊन दुर्गंधी आणि रोजराई कमी होण्यात मदत होणार आहे.

4. बबल जेट फाऊंटन – सुशोभित कारंजा प्रकारातील बबल जेट फाऊंटन असणार आहे. यामुळे गोदा पार्कच्या सौंदर्यात भरच पडणार आहे.




Ramps and Steps




5. रॅम्प्स ॲण्ड स्टेप्स- गोदा पार्कमध्ये फेरफटका मारण्यासाठी आणि तेथील निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी स्टेप्स बनवण्यात येणार आहेत. आणि दिव्यांगांचा विचार करता रॅम्पही असणार आहे. म्हणजे जेणे करून व्हील चेअर तेथे आरामशीर नेता येणार आहे.


6. ॲम्पी थिएटर- गोदा पार्कमध्ये ओपन ॲम्पीथिएटर असणार आहे. दगडी बाकं असतील, ओपन ॲम्पिथिएटरमध्ये नाशिकच्या ऐतिहासिक वारशा संदर्भात चित्रफीत दाखवण्यात येणार आहे. त्याचबरोबर मनोरंजनपर कार्यक्रम असणार आहेत.

ॲम्पीथिएटर




7. उपहारगृह – चोखंदळ खवय्यांसाठी गोदा पार्कमध्ये उपहारगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. ओपन रेस्टॉरंट येथे असणार आहे. जगभरातून येणारे पर्यटक येथे नाशिकच्या प्रसिद्ध पदार्थांची चव चाखू शकतील.


उपहारगृह



8. बोर्डेक्स मीरर इफेक्ट — एखाद्या जादूच्या बेटाप्रमाणे हा प्रकल्प असणार आहे. म्हणजे काय? तर, मिरर इफेक्ट विथ फॉगचा आभास. म्हणजे आता पर्यटक नाशिकला आल्यावर रामकुंड परिसरात थोडक्यात गोदा प्रकल्पातील प्रकल्पांना भेट देताना असं म्हणेलही ‘यहाँ फॉग चल रहा है’.

बोर्डेक्स मीरर इफेक्ट म्हणजे, मिस्ट पूलचा अनुभव. थोडक्यात काय तर दिवसभर सूर्यप्रकाशात येथे धुक्याचा आभास पर्यटकांना आणि नागरिकांना अनुभवता येणार. सायंकाळी येथे पाणी दिसणार आणि रेस्टॉरंटची प्रतिकृती त्या पाण्यामध्ये म्हणजेच मिरर इफेक्ट दिसणार. छाया-प्रतिछाया या धर्तीवर बोर्डेक्स मीरर इफेक्ट येथे बनवण्यात येत आहे. मनोरंजन आणि एक वेगळी अनुभूती यातून नागरिक आणि पर्यटकांना मिळणार आहे. हे ओपन टू स्काय असल्याने त्याची अनुभूतीही तितकीच रमणीय

**बोर्डेक्स मीरर इफेक्ट**



असणार आहे.

9. गोदा रिबन - आता विचार करा आपण गोदावरी नदीकाठी आहोत. सायंकाळची वेळ आणि विदेशाच्या धर्तीवर लाईट असलेल्या बाकड्यांवर आपण बसलो आहोत. काय आला ना फील राव तेच तर म्हणतोय. गोदा रिबन असंच आहे. आर्टीफिशीयल स्टोनचा वापर करून बनवलेली बाकं म्हणजेच गोदा रिबन





असणार आहे. त्यात विशेष म्हणजे एलईडी लाईटची व्यवस्था करण्यात आली आहे. गोदावरी नदी प्रवाहीत होते आहे असा आभास त्यातील लाईटमध्ये असल्याने त्याला ‘गोदा रिबन’ असे नाव देण्यात आले आहे. त्यातही आर्टीफिशीयल स्टोनचा वापर असल्यामुळे पूर काळात या बाकांचं नुकसान कमी प्रमाणात होईल. झालं की नाही इकोफ्रेंडली आणि नुकसान प्रूफ. एकदा अनुभूती घ्यावीच.

10. रॉक गार्डन (मुलांना खेळण्यासाठी क्षेत्र) – लहान मुलं कुणाच्या घरात नसतात. त्यांना फिरायला नेताना पहिले त्यांच्या खेळण्याचा विचार करण्यात येतो. तर, गोदा पार्कचा विचार करताना सर्वात पहिले याचाच विचार करण्यात आला. आता नदी किनारा, त्यामुळे पावसाळ्याच्या काळात पूर येणारच. अशा परिस्थितीत येथील खेळणी आणि साहित्य खराब होऊ नये म्हणून काय करायचं असा प्रश्न जेव्हा स्मार्ट सिटी टीम समोर उभा राहिला. त्यावेळी खेळणी तर हवी मुलांच्या मनोरंजनासाठी फार महत्त्वाची आहे. त्यामुळे येथे दगडी खेळणी म्हणजेच रॉक गार्डन बनवण्याचा आराखडा तयार करण्यात आला. आणि आता ते रॉक गार्डन लवकरच आकार घेईल. म्हणजे एक गोष्ट नक्की की हो पर्यटकांना पर्टनासोबतच त्यांच्या मुलांच्या खेळण्याची चिंता तर मिटली मात्र, नागरिकांनाही त्यांच्या चिमुरड्यांना जास्त दूर नेण्याची गरज नाही, गोदा पार्क आहे की हो....

**Children’s Play Area (मुलांना खेळण्याचे क्षेत्र)**



11.  वॉक वे/ ॲक्यूप्रेशर पाथ वे – मनोरंजनाबरोबरच गोदा पार्कमध्ये आरोग्याचाही विचार करण्यात आला आहे. ॲक्यूप्रेशर पाथ वे मध्ये आपल्याला ॲक्युप्रेशरचा अनुभव मिळणार आहे. त्यामुळे तणावाच्या वातावरणातून शांततेच्या वातावरणात आल्याची अनुभूती आपण घेऊ शकाल.

**वॉक वे / ॲक्युप्रेशर पाथवे**






- Swings along the bank of theriver.
- Acupressure area.






47

12. जीओ टेक्सटाईल शीट (वृक्षारोपण)- गोदा पार्कच्या सौंदर्यात भर टाकण्याचा विचार करण्यात आला त्यावेळी वृक्षारोपण समोर उभे राहिले. त्यातही पुराचा धोका पाहता येथे लावण्यात येणाऱ्या झाडांचं नुकसान होऊ नये याद्दष्टीने विचार करण्यात आला. आणि जीओ टेक्सटाईल शीट येथे लावण्याचे ठरले. साधारण उतारावर हे जीओ टेक्सटाईल शीट लावण्यात येणार आहे. साधारणपणे पाण्यातच वाढणारी ही गवता सारखी झाडं आहेत, त्यामुळे पुरामध्येही ही झाडं तग धरतील आणि नुकसान झालं तरी कमीच होईल. कारण पुन्हा ती वाढतील आणि नव्याने लावावी लागणार नाहीत. आहे की नाही इकॉफ्रेंडली.

**Plantation on Slope**













13. गोदा वॉक/ हेरीटेज वॉक – ऐतिहासिक काळाची अनुभूती यावी या हेतूने हेरीटेज वॉकची निर्मिती करण्यात येत आहे. रामायण काळातील गोष्टी भित्तीचित्रांच्या रुपात येथे पहायला मिळणार आहेत. या मार्गावरून जाताना आध्यात्मिक काळात प्रवास करत असल्याची अनुभूती मिळणार आहे. प्रतिकृती आणि मुर्तींच्या सहाय्याने रामायण काळ उभा करण्यात येणार आहे. त्यामुळे पर्यटक आणि नागरिकांना त्या काळात नाशिकमधील परिस्थितीचा अनुभव या काळात घेता येणार आहे. मनोरंजनातून आध्यात्मिक






- The stories from Ramayana to be depicted in the form of the Diorama (life size sculpture).



Master Plan for Goda walk

50


आणि ऐतिहासिक काळात जाताना यामुळे नागरिक आणि पर्यटक त्या काळाची अनुभूती घेतील. मौर्य काळातील घटना येथे मुर्ती आणि प्रतिकृतीच्या रुपाने कोरण्यात येणार असल्याने त्या काळाची अनुभूती तुम्ही घेऊ शकाल. आहे की नाही मौर्य काळ अनुभवण्याची संधी.

सातवाहन काळाबाबतही त्या काळात घडलेल्या घटना यांची प्रचिती येथे मिळणार असल्याने पर्यटक तर खूश होतीलच त्याचबरोबर नाशिककरांनाही तो इतिहास प्रत्यक्ष त्या काळात गेल्याचा आभास करून देणारा ठरणार आहे.

राष्ट्रकूट आणि चालुक्य काळाबाबतही पर्यटक असो की नागरिक त्या काळाशी एकरूप होऊन पुढे रामकुंडाकडे जाणार असल्याने. रामकुंडाचे ऐतिहासिक आणि अध्यात्मिक महत्त्व अनुभवून तसेच त्या काळामधून गेल्याची अनुभूती आल्याने पर्यटक आणि नागरिक रामकुंडावर जाताना अध्यात्मिक अनुभूतीत राहतील.


14. आध्यात्मिक परिसर – नाशिकचे आध्यात्मिक महत्त्व विशद करणारा हा प्रकल्प असणार आहे. अनेक धार्मिक आणि इतर गोष्टींचा यामध्ये विचार करण्यात आला आहे. पर्यटकांच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. पाण्याची गुणवत्ता सुधारण्यात याद्वारे फायदाच होणार आहे. नागरिकांना चालण्याची आणि त्यांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीनेही येथे वॉक वे असणार आहे.

15 सुंदर नारायण मंदिराजवळी घाटाचे सुशोभिकरण – गोदावरी नदीचे दोन्ही किनारे जेट्टीद्वारे प्रथमच जोडले जाणार आहेत. त्यामुळे पर्यटनामध्ये भर तर पडेलच मात्र, पर्यटकांना एक वेगळी अनुभूतीही मिळणार आहे.




गोदा पार्कचा विचार करताना सुंदर नारायण मंदिराजवळी घाटाचे सुशोभिकरण त्यात अंतर्भूत करण्यात आले. सुंदर नारायण मंदिर हे अतिप्राचिन मंदिरांपैकी एक असून नाशिकच्या मंदिरांच्या वासशाला ते समृद्ध करते. येथे लहान मुलांना खेळण्यासाठी जागा असणार आहे, जेट्टी असणार आहे, एक्युप्रेशर मार्ग येथे असेल, तसेच सुंदर नारायण मंदिराकडे जाण्यासाठी पायऱ्या असणार आहेत.


16 गोदा घाट सुशोभिकरण – गोदा घाट नाशिककरांच्या अगदी जिव्हाळ्याचा त्याचसोबत पर्यटकच काय तर चित्रपट निर्मात्यांच्याही जिव्हाळ्याचा विषय ठरला आहे गोदा घाट. अशा या गोदाघाटावरील काही कुंडांमध्ये काँक्रीटीकरण करण्यात आले होते. त्यातील धोबी घाट, रामगया कुंड येथील काँक्रीटीकरण काढण्यात येऊन गोदावरी नदीचे पात्र विस्तृत करण्यात येणार आहे. त्याचबरोबर इतर ज्या काही




कुंडांमध्ये अशा प्रकारे काँक्रीटीकरण करण्यात आले असेल ते काढण्याचा विचार सुरू आहे. डी काँक्रीटीकरण केल्यामुळे गोदावरी नदीची पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढणार आहे, त्याचबरोबर पूर काळातही त्याचा फायदा होणार आहे. त्यामुळे पूर काळात गोदावरी नदी पात्राबाहेर येणाऱ्या पाण्याची पातळी कमी होण्यात मदत होणार आहे. एकंदर काय तर गोदावरीतील जिवंत झरे पुर्नजीवित होण्यात मदत होईल. आणि पाण्याचा फ्लो सुद्धा वाढेल.

गोदा घाटाच्या पायऱ्यांचे पुर्नरेखांकन करण्यात येत आहे. आणि त्यात सुधारणा करण्यात येत आहे. दीपस्तंभही नव्याने आणि नवीन रेखांकनांनुसार बसविण्यात येणार आहेत. कुंडांजवळ गाड्यांना बंदी करण्यात येणार असून नो पार्किंग झोनही करण्यात येणार आहे. गांधी तलावाजवळ बसण्यासाठी व्यवस्था करण्यात येत आहे. एकंदर गोदा घाटाला आधुनिक टच देऊन पर्यटनाच्या दृष्टीने आणि नाशिककरांच्या दृष्टीने तो अतिशय देखणा करण्यात येत आहे.


17 पावसाळी नाले व गटार- पूर काळात नाल्यांमधील आणि गटारींमधील पाणी ओव्हरफ्लो झाल्याने नदीमध्ये मिसळते. त्यामुळे रामवाडी नाला ते कपालेश्वर पोलीस चौकी परिसरातील 450 एमएम पाईप लाईन 700 एमएममध्ये परावर्तीत करण्यात येत आहे. तसेच कपालेश्वर पोलीस चौकी ते समाधान शू मार्ट येथे 900 एमएमची पाईपलाईन तयार करण्यात येत आहे. एनएमसी लायब्ररी ते भाजी मार्केट परिसरात 2x2 एमएम चा ड्रेन बॉक्स टाकण्यात येणार आहे. हे सर्व काम आरसीसीमध्ये असणार आहे. यामुळे पुराचा धोका आणि सांडपाणी नदीमध्ये मिसळण्याचा धोका कमी होऊन गोदावरी नदीचे पावित्र्य राखले जाणार आहे.




18 पाण्याची पाईपलाईन — इंद्रकुंडामध्ये बाराही महिने पाणी राहते आणि ते पाणी रामकुंडामध्ये आणण्याचा विचार करण्यात आला. अरूणा नदीमध्ये इंद्रकुंडातील पाणी पाईपलाईनद्वारे आणण्यात येणार आहे. अरूणा नदीचे पाणी रामकुंडात मिसळते. अरूणा संगम असे त्याला म्हटले जाते. अरूणा नदीमध्ये पाणी बाराही महिने येत राहिल्यास पर्यटकांना त्याची अनुभूती मिळेल आणि स्वच्छ पाणी बाराही महिने येथे असणार आहे. आहे की नाही सोने पे सुहागा....



19. निर्माल्य कुंड- गोदावरी नदीचा धार्मिक आणि आध्यात्मिक विचार करता जगभरातून पर्यटक रामकुंडावर येत असतात. येथे विधी आणि क्रिया कर्म करतात त्यामुळे तो अनुभव तसाच ठेवून रामकुंडाच्या कुठल्याही आस्थेला हात न लावता येथे निर्माल्य कुंड उभारण्यात येत आहेत. त्यामध्ये नागरिक, पर्यटक निर्माल्य विसर्जीत करू शकतील त्याचबरोबर इतर धार्मिक विधीही येथे करता येणार आहेत. या कुंडाचा विचार करताना गोदावरीचे पावित्र्य जपले जावे, पर्यावरण पूरक ते असावे आणि धार्मिक तसेच आध्यात्मिक भावनेला धक्का लागू नये म्हणून प्रयत्न करण्यात आले. आणि येत्या काही दिवसांत आपण त्याचा अनुभव घ्यालच....




प्रशांत चिडे,
जनसंपर्क अधिकारी,
नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी
डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड.

(टीप - या ब्लॉग मधील माहिती वापरण्यापूर्वी नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटीडेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेडची परवानगी घ्यावी)